**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१**

**E-mail :- pune.ee@mahapwd.com**

दूरध्वनी क्रमांक: - ०२०-२६१२२४८५
फॅक्स क्रमांक: - ०२०- २६१२२४१४


जा.क्र. प्रशा/ आस्था-१/ **२५९** /सन २०१६ **दिनांक - १६.३.२०१६**

---

**वेबसाईटवर देणेसाठी**

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग पुणे परिमंडळीय सरळसेवा पदभरती २०१४ अंतर्गत **शुध्दीपत्रक भाग १** अन्वये **स्थापत्य अभियांत्रिकी सहायक / कनिष्ठ लिपिक नि टंकलेखक/ आरेखक श्रेणी ३ (अनुरेखक )/प्रयोगशाळा सहायक/ सहायक भांडारपाल / वाहनचालक** या संवर्गातील रिक्त पदाच्या पदभरतीकरिता लेखी परीक्षा घेण्यात आलेली होती. तसेच प्राप्त झालेल्या लेखी परीक्षेच्या गुणांवर आधारित अंतरीम पात्र असलेल्या **उमेदवारांची यादी**

१) ..............................................................................................................

२) ..............................................................................................................

३) ..............................................................................................................

सदरील अंतरिम पात्र उमेदवारांनी खाली नमूद वेळापत्रकात त्यांच्या यादीतील अनुक्रमांक समोर दर्शविलेल्या दिनांक व वेळेत **विश्वेश्वरया हॉल, अर्सेनल प्लॉट, एस. जी. एस. मॉल मागे , हॉटेल सागर प्लाझा समोर कॅम्प पुणे ४११००१** या ठिकाणी स्वखर्चाने व स्वत:च्या जबाबदारीवर उपस्थित राहून पदभरती अर्जात स्वाक्षांकित प्रतिज्ञा पत्रास अनुसरून पदभरती अर्जामध्ये ज्या ज्या बाबी साठी होय असा उल्लेख व नमूद केलेला आहे त्या बाबीच्या पृष्ठर्थ तसेच अनिवार्य शैक्षणिक पात्रता व अनुषंगिक आरक्षण प्राप्त अर्हतासाठी नमूद आवश्यक मूळ प्रमाणपत्र / कागदपत्रे / दाखले व प्रत्येक कागदपत्राच्या दोन साक्षांकित प्रतीसह तसेच खाली नमूद कागदपत्राच्या मूळ व दोन साक्षांकित प्रतीसह प्रशासकीय प्रक्रीया पूर्ण करावी.

| दिनांक | पद | यादीतील अनुक्रमांक | एकूण उमेदवार | वेळ |
|---|---|---|---|---|
| २२.०३.२०१६ | कनिष्ठ लिपिक नि टंकलेखक | **१ ते ३२** | ३२ | सकाळी १०.३० ते १३.३० |
| २२.०३.२०१६ | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | **१ ते ३६** | ३६ | दुपारी १४.३० ते १७.३० |
| २३.०३.२०१६ | प्रयोगशाळा सहाय्यक | **१ ते २** | २ | सकाळी १०.३० ते ११.०० |
| २३.०३.२०१६ | आरेखक श्रेणी ३(अनुरेखक ) | **१ ते ९** | ९ | सकाळी ११.०० ते १३.०० |
| २३.०३.२०१६ | सहाय्यक भांडारपाल | **१ ते ४** | ४ | दुपारी १३.०० ते १४.३० |
| २३.०३.२०१६ | वाहन चालक | **१ ते १४** | १४ | दुपारी १५.०० ते १७.३० |

अ) उपनिर्दिष्ट नमूद दिनांक व वेळेस पात्र उमेदवार यांनी कागदपत्रांसह निर्देशित ठिकाणी उपस्थित न राहिल्यास उमेदवारांची पात्रता रद्द करणेत येईल याबाबत कोणताही दावा/हरकत/तक्रार कोणत्याही न्यायकक्षेते शासनास मान्य होणार नाही.

ब) पात्र उमेदवारांनी उपनिर्दिष्ट नमूद दिनांक व वेळेस निर्देशित ठिकाणी स्वखर्चाने व स्वत:च्या जबाबदारीवर प्रशासकीय पूर्ततेसाठी उपस्थित राहणेचे आहे. त्यासाठी कोणताही प्रवासभत्ता/सवलत/खर्च /अनुदान अनुज्ञेय वा देय होणार नाही.

**अनिवार्य कागदपत्रांची सूची :**

१) www.mahapwd.com या संकेतस्थळावर भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट प्रत.

२) परीक्षा फी भरलेल्या चलनाची मूळ प्रत.

३) भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा अधिवास असलेले प्रमाणपत्र

४) मागासवर्गाच्या निवड झालेल्या उमेदवारांनी मूळ जात प्रमाणपत्र व जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र

५) शैक्षणिक पात्रता :- जाहिरातीत नमूद केलेल्या अर्जासोबत सादर करणेत आलेल्या शैक्षणिक पात्रता पृष्ठर्थ आवश्यक व अनुषंगिक प्रमाणपत्रे व कागदपत्रे

६) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग आणि इतर मागास प्रर्व यांच्यासाठी आरक्षण अधिनियम – २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) मधील कलम ४(२) (दोन) खालील परंतुका अन्वये उन्नत व प्रगत गटाचे क्रीमीलेयर तत्व, विजा –अ, भज- ब, भज- क , भज-ड विमाप्र व इमाव या प्रवर्गांना लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय विभाग, क्र् सीबीसी१०/२००६/प्र.क्र. १५/मावक -५ दि. ३० जून २००६ सोबतच्या सुधारी नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी वर्ष २०१३-१४ या कालावधीकरिता वैध असलेले अर्थात दि. १/४/२०१३ पासून अथवा तदनंतर निर्गिमित केलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉनक्रीमिलेयर प्रमाणपत्र.

७) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र. ८२/२००१/म.से.अर- २००/प्र.क्र. ४१५/का. २ दि. २२ मे २००१ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणाअंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी वर्ष २०१३-१४ या कालावधीकरिता वैध असलेले अर्था त दि. ३१/३/२०१४ पर्यत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉनक्रीमीलेयर प्रमाणपत्र.

८) माजी सैनिक : - उमेदवारांनी माजी सैनिक असलेबाबत जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र व माजी सैनिकास दिलेल्या ताम्रपटाची साक्षांकित प्रत. वारस असलयास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्र

९) अंशकालिन :- अंशकालिन उमेदवारांनी सेवायोजन कार्यालयात किंवा रोजगार स्वयंरोजगार कार्यालयात अंशकालिन काम केल्याचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र

१०) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ,ब,क,ड मधील पदांचा सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र.

११) गुणवत्ताधारक खेळाडू :- उमेदवार महाराष्ट्र ऑलिम्लिक असोसिएशन यांनी स्वत: अथवा महाराष्ट्र ऑलिम्लिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या राज्य संघटनेने तसेच ज्या खेळाची नोंदणीकृत राज्य संघटना त्यांच्या अधिकृत

राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असेल तसेच सदर राष्ट्रीय संघटनेला इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनने संलग्नता दिलेली आहे अशा संघटनेनी आयोजित केलेल्या त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धात किंवा भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामीणव महिला स्पर्धात किंवा भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धात प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण ,रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा आहे.

१२)प्रकल्पग्रस्त उमेदवार : ज्या प्रकल्पान्वये उमेदवार प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित असेल त्याबाबतचा जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र

१३)टंकलेखन — शासकीय किंवा राज्यशासन मान्यता प्राप्त संस्थेमार्फत टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकासह प्रमाणपत्र.

१४) संगणक /माहिती तंत्रज्ञान :- शासन निर्णय क्र. मांतस-२०१२/प्र.क्र. २७७/३९ दि. ४ /२/२०१३ मध्ये नमूद संगणक माहिती तंत्रज्ञान विषयक अर्हता प्राप्त परीक्षेचे प्रमाणपत्र

१५) शासकीय कर्मचारी :- उमेदवारांनी ते सध्या कार्यरत असणा-या कार्यालयामधील वर्ग १/ वर्ग २ दर्जाच्या अधिका-याकडून त्यांचे सेवाविषयक म.ना.से. (वर्तणूक) १९ अन्वये वर्तणूकबाबत दाखला

१६) अपंग उमेदवार :- अपंग उमेदवारांनी अपंगत्वाचे प्रमाण दर्शविणारे जिल्हा शल्य चिकित्सक व शासकीय वैदयकीय मंडळाचे प्रमाणपत्र

१७) उमेदवारांचे दोन आयडेंटीटी आकाराचे दोन रंगीत फोटो.

१८)रोजगार सेवायोजन कार्यलयात नाव नोंदणी केली असल्यास नाव नोदणी कार्ड अथवा सक्षम पुरावा.

**सदस्य सचिव**
**तथा**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे**

प्रत : मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत : अध्यक्ष तथा अधीक्षक अभियंता, सा. बां. परिमंडळ पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत: अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ कोल्हापूर यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत : अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ सोलापूर यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत : कार्यकारी अभियंता प्रकल्प विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत: कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत : समन्वयक पदभरती २०१४ तथा उपविभागीय अभियंता उपविभाग कवठेमहांकाळ जि सांगली यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत : कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत : कार्यकारी अभियंता सहनिर्देशक, अंमलबजावणी कक्ष नगररचना येरवडा पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर